# पुष्पशास्त्र व प्रांगण विद्या विभाग,
# डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

जा.क्र./वि.प्र.पु.शा.वि./ ४४६ /२०२४ दि. 18/03/24

## दरपत्रक सूचना

प्रती,

.......................................

.......................................

.......................................

**विषय: डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान येथे सुरक्षा कर्मचारी, (महिला/ पुरुष) ठेका पद्धतिने लावणे बाबत ....**

डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला अंतर्गत येणाऱ्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान येथे सुरक्षा कर्मचारी (महिला/ पुरुष) कंत्राटी पद्धतीने एकूण ६ महिने कालावधी साठी कामावर घेणे करिता दर पत्रकातील विहित शर्ती व अटीचे अधीन राहून मान्यताप्राप्त परवाना धारक व कामगार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांचा परवाना असलेल्या कंत्राटी मजूर ठेकेदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. 18/03/2024 पासून ते 25/03/2024 चे दुपारी 5.00 वाजेपर्यंत राहील. दरपत्रक योग्य दरासह खालीलप्रमाणे विहित नमुन्यात कार्यालयास सादर करावे.

विभाग प्रमुख

पुष्पशास्त्र व प्रांगण विद्या विभाग

डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला

| अ.क्र | विवरण | कामची वेळ | कर्मचारी संख्या | कामाचे वर्णन | दर/ दिवस (रु) | विवरण | Skilled contractual labour (Rs.) (Ticket Counter helper/per person) | Unskilled contractual labour (Rs.) (Security/per person) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उद्यान डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला | | | | | | | |
| १. | पुरुष सुरक्षा कर्मचारी | सकाळी ५ ते दुपारी १<br>दुपारी १ ते रात्री ९ | ०२<br>०२ | एक सुरक्षाकर्मी प्रवेश द्वारावर राहून टिकीटाची तपसणी करून नागरिकांना उद्यानात प्रवेश देणे व दुसऱ्या कर्माचाऱ्याने उद्यानामध्ये फिरते राहून निगराणी करणे तसेच महिला सुरक्षा कर्मचारी यानी फिरते राहून निगराणी करणे इत्यादी. | | Basic Wages | - | |
| | | | | | | Variable Dearness A | - | |
| | | | | | | Total Minimum Wages | - | |
| | | | | | | EPF13% | - | |
| | | | | | | ESIS 4% | - | |
| २. | महिला सुरक्षा कर्मचारी | सकाळी ८ ते दुपारी ४ | ०१ | | | Service Charges for Company/Firm Charges | - | |
| | | | | | | Total Rs. | - | |
| | | | | | | GST 18%(If applicable) | - | |
| | | | | | | Total with GST | - | |
| | | | | | | Rate per month per unit Rs.) | - | |

विभाग प्रमुख
पुष्पशास्त्र व प्रांगण विभाग ,
डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला

## अटी व शर्ती

१. दरपत्रक हे सीलबंद पाकिटातून सादर करावे.
२. दरपत्रक हे सहयोगी अधिष्ठाता, उद्यानविद्या महाविद्यालय, डॉ. पं.दे.कृ.वी. अकोला यांचे नावे सादर करावे.
३. तसेच दरपत्रकाचे सीलबंद पाकीट हे विभाग प्रमुख, पुष्पशास्त्र व प्रांगण विद्या विभाग, डॉ. पं.दे.कृ.वी. अकोला यांचे नावे असावे.
४. दरपत्रकातील दर हे प्रती महिन्याप्रमाणे असावे.
५. कंत्राटी मजूर पुरविण्याचा अध्यावत परवान्याची सत्यप्रत जोडावी.
६. दरपत्रक सादरकर्त्यांनी दरपत्रकात दिलेले दर स्पस्ट व सुवाच्य अक्षरात दिसतील याप्रमाणे भरावे.
७. खोडतोड असलेली, पांढरी शाई लावलेली अथवा कोणत्याही कारणास्तव खराब झालेले दरपत्रक स्वीकारण्यात येणार नाही.
८. कंत्राटदाराने करारनामा लिहून दिल्यानंतर मागणी केल्यानुसार कंत्राटी मजूर पुरविणे बंधनकारक राहील.
९. कंत्राटदाराने दरपत्रकात कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतुदीपेक्षा कमी रुक्कम नमूद करू नये. थोडक्यात कृषी विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारित केलेले किमान वेतन कायद्यानुसार कंत्राटी कामगारास वेतन देणे बंधनकारक राहील.
१०. बाल मजूर कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहील.
११. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते अभिलेख ठेवणे बंधनकारक राहील.
१२. पुरवठादाराने कामगारास ई.पी.एफ, सामान्य विमा याबाबतची सविस्तर माहिती दर महिन्याला या कार्यालयास कळविणे बंधनकारक राहील तेव्हाच सदरील महिन्याचे देयक पारित करण्यात येईल.
१३. कंत्राटी मजूरास काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मृत्यू संभविल्यास कीवा निसर्गीक आपत्ती उदा.वीज, पाऊस,भूकंप,मशनरी अपघात, प्राणी / साप कीवा वादळामुळे इजा अपघात मृत्यू सभंविल्यास त्याची सर्व भरपाई व ईतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याचा कार्यालयाशी कसल्याही प्रकारचा संबध राहणार नाही.
१४. कंत्राटी मजुराने काम समाधानकारक न केल्यास त्याला त्या दिवशी परत पाठविण्यात येईल व कंत्राटदारास त्या दिवसाचे त्या कंत्राटी मजुराचे देयक अदा करण्यात येणार नाही.
१५. कोणतेही कारण न देता दरपत्रक रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्नलिखित स्वाक्षरीकर्त्यांना राहील.
१६. कंत्राटदाराने कामावर ठेवलेल्या मजुरीची हजेरी पत्रक कामाच्या ठिकाणी ठेवणे बंधनकारक राहील तसेच विभाग प्रमुख यांना केव्हाही हजेरीपत्रक तपासण्याचा अधिकार राहील व तपासणीमध्ये कंत्राटी मजुर कामावर न आढळल्यास गैरहजेरी मांडण्यात येईल.
१७. कामाचा कालावधी आदेश दिल्यापासून प्रती महिन्या प्रमाणे एकूण ६ महिने करिता राहील.तथापि कार्यालय सदर कंत्राट मुदतपूर्व रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.
१८. कराराचे संदर्भात अंतिम निर्णय विध्यापीठाचा राहील.
१९. कंत्राटदार यांचे कडून वरीलपैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग झाल्यास अथवा कंत्राटी मजुराचे काम समाधानकारक नसल्याचे आढळून आल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करून विध्यापीठाकडे जमा केलेली अनामत रुक्कम जप्त करण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील.
२०. कंत्राटदाराने नियम व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.
२१. दरपत्रक निम्न स्वाक्षरीकर्ता यांचे दालनात दिनांक 26/03/2024 ला संध्याकाळी ५.०० वाजता उघडण्यात येईल.
२२. उद्यान परिसरात अनधिकृत व्यक्ती (विना टिकीट) आढळून आल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. टिकीट तपसणी कोणत्याही वेळेस निमस्वाक्षरीकार वा नियंत्रण अधिकारी अथवा त्याचे परवानगीने विद्यापीठ करू शकेल.

सुरक्षा रक्षका करिताअटीवशर्ती

१. शहर बगीचा येथील मालमत्तेची सर्व जबाबदारी

२. बगीचा मध्ये फिरणे करिता येणाऱ्या सर्व नागरिकाची सुरक्षा करणे.

३. तिकीट काऊटरवर होणारे वादविवाद मिटविणे.

४. विना तिकीट वा विना पास कोणालाही प्रवेश नाकारणे.

५. उद्यानामध्ये खेळायला येणाऱ्या लहान मुलाची सुरक्षा करणे.

६. उद्यानाच्या मोठ्या हिरवळीवर जाण्यास परवानगी नाकारणे.

७. महिला जीम मध्ये पुरुष जाता कामा नये.

८. उद्यानामध्ये लागवड करण्यात आलेले फुलझाडे राखणफुले, पाने न तोडू देणे.

९. विद्रूत वाहिनी तसेच विहिरीपासून नागरिकाना दूर ठेवणे.

१०. उद्यानामध्ये दारू, सिगारेट, गुटका इत्यादी खाण्यास व वापरण्यास मज्जाव करणे.

११. तिकीट काऊटरवरील व्यक्तीची सुरक्षा करणे.

१२. पार्किंग मधील वाहने शिस्तीत लावणे.

१३. उद्यान वेळेवर उघडणे व बंद करणे.

१४. उद्यानातील दिवे (लाईट) वेळेवर लावणे व बंद करणे.

१५. उद्यानाची संपूर्ण जबाबदारी ही सुरक्षा रक्षकाची राहील.